नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३
नि. २५९

वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवर जबाब
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव— सुरेश वडीलांचे/पतीचे नांव — बळीराम राणे
वय सुमारे ६३ वर्षे, धंदा— सेवानिवृत्त
रा.ओझरम, ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग.

सरतपास वादीतर्फे ॲड. श्री. आर.एस्. गव्हाणकर यांचेमार्फत

१. सन २००१ च्या दरम्यान मी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सावंतवाडी येथे निमतानदार म्हणून नेमणुकीस होतो. अनुरेखक व निमतानदार एकसारखेच पद असून निमतानदार हे मोजणीदाराच्या वरचे पद आहे. न्यायालयाच्या नि. ८४ च्या आदेशाप्रमाणे न्यायालयीन आयुक्त म्हणून मी दावा मिळकतीची दिनांक २२/१०/२००१ रोजी मोजणी केली होती. त्यासाठी मी संबंधितांना नोटीसा पाठवल्या होत्या. नकाशाची 'अे' शिट आमच्या कार्यालयात असते. 'बी' शिट मागणी केल्यावर संबंधित पक्षकाराला दिली जाते. मी आज सोबत 'अे' शिट आणलेली आहे. मला आता नि. ९४ सोबत दाखल केलेली 'बी' शिट दाखवली. ती मी मोजणी केल्याप्रमाणे व 'अे' शिटप्रमाणे बरोबर आहे. त्यामध्ये मी जशी जाग्यावर वस्तुस्थिती पाहिली तशी नमुद केली आहे. मी ती मोजणी प्लेन टेबल पध्दतीने केली. मोजणीच्यावेळी मी संबंधितांचे जबाब घेतले होते ते नि. ९४ सोबत दाखल केलेले आहेत. मोजणीसाठी १:१००० असे स्केल होते. मी मोजणीच्यावेळी तेथे जागेवर जी बांधकामे होती ती नकाशात दाखवलेली आहेत. मी जागेवरील विहिर, विजेचे खांब नकाशात दाखवले व तसे टिपांमध्ये लिहिलेले आहे. मी नकाशासह अहवाल सुरूवातीला आमच्या कार्यालयात दाखल केला व त्यांनी तो मान्य केला. नकाशावर मुख्यालय सहा. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांची सही व शिक्का आहे. तसेच त्यावर निमतानदार म्हणून माझीही सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि २६०** दिली आहे. नकाशात लाल व निळया रंगाने दाखवलेली पोटहिश्याची हदद आहे. ती हद्द जुना स.क्र. २२७ हि.क्र. १ पैकी फाळणी क्र. १ पैकी आहे. नकाशात निळया रंगामध्ये प्लॉट क्र.६, ७ व ८ आहेत. नकाशात पिवळया रंगाने 'अे' या अक्षराने दाखवलेला भाग हा लगत जुना स.क्र. ३१९ हि.क्र. १ पैकी असून 'बी' या अक्षराने दाखवलेला भाग हा लगत जुना स.क्र. ३५५ मधील हि.क्र. २४ पैकी असून त्यात वादी हे त्यांची वहिवाट असल्याचे सांगतात असे लिहिलेले आहे. अ.क्र. ४ च्या टिपेमध्ये अे,बी,सी,डी,इ,एफ जी, एच,आय,जे, के,एल. या अक्षराने दाखवलेल्या भागात वादीची वहिवाट आहे असे नमुद केलेले आहे.

उलटतपास प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११, १३, १४ व १६ तर्फे वकील श्री.एस्.जी. पणदुरकर यांचेमार्फत

२. हे म्हणणे खरे आहे की, भूमी अभिलेखाच्या रेकॉर्डप्रमाणे अधिकार अभिलेखात स. क्र. २२७ चे मुळ हि.क्र. १ मध्ये अ,ब,क झालेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अ,ब व क कोठून सुरू झाले व कोठे संपले हे समजून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे

कोणत्या पोट हिश्श्यात अतिक्रमण झालेले आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कोणाचा, कोणत्या पोट हिश्श्यात कब्जा व वहिवाट आहे हे ही सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नकाशातील टिप क्र. ४ मध्ये लिहिलेला मजकूर हा वादी गोविंद कृष्णाजी वाळके याने सांगितला म्हणून लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला जागेवर टिप क्र. ४ प्रमाणे वहिवाट दिसली नव्हती. फाळणी क्र.१ चे कोणते पोट हिस्से झाले हे मला सांगता येणार नाही. कारण त्याबाबतचे रेकार्ड आमच्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, फाळणी क्र.१ मधील प्लॉट क्र ६, ७ व ८ हे कोणत्या पोटहिश्श्यात आहेत हे मला सांगता येणार नाही. नकाशातील पिवळा भाग हा दावा मिळकत नसून ती दुसरी मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाळके हे पिवळया रंगाच्या पुढे हे तुटक रेषा दाखवली आहे तिथपर्यंत त्यांची दावा मिळकतीची हदद असल्याचे सांगत होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत असलेली बांधकामे ही सन १९८८ च्या पूर्वीची जुनी होती.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ४ तर्फे वकील श्री.सी.अे. आकेरकर यांचेमार्फत</u>

प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११, १३, १४ व १६ यांचा उलटतपास स्विकारला.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/—
(एम्.एस्.बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) ,
सावंतवाडी.

दिनांक :— १८/०१/२०१८.